**रेफ आय टी ८/२००९**

सरतपास नि. यु — २४८

साक्षीदाराचे नाव : श्रीमती मालन भगवान वाघमारे शपथेवर
उलटतपास
श्री जे बी शालीग्राम वकिल प्रथम पक्षकार तर्फे उलटतपास

१४. माझे शिक्षण झालेले नाही. मला लिहीता वाचता येत नाही. आमच्या संघटनेने काय केस केली आहे ते मी वाचलेले नाही. माझ्या सरतपासात काय लिहीले आहे हे मी वाचलेले नाही व ते मला माहित नाही. हे खरे की प्रथम पक्षकारांनी मला नोकरीवर ठेवल्याबद्यल व काढून टाकल्याबद्यल लेखी आदेश दिलेला नाही. मला कामावर ठेवतांना लेखी आदेश का दिला नाही हे मी प्रथम पक्षकारांना विचारले नाही. हे खरे नाही की महानगरपालीकातील कोणतेही अधिकारी आमच्या कामात लक्ष घालत नव्हते. स्वच्छतागृहांची निघाह ठेवण्याची जबाबदारी महानगरपालीकेची होती हे मी माहिती करून घेतली होती. मी लेखी माहिती करून घेतली नव्हती. मी द्वितीय पक्षकार संघटनेकडे सभासद असल्याबद्यल लेखी पुरावा दाखल केला आहे किंवा नाही हे मला माहित नाही. राष्ट्रीय श्रमिक संघ ने आमच्या नोकरी संदर्भात उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात केसेस दाखल केले होते याची मला माहिती आहे. त्या केसेस मध्ये सुलभ एन्टरप्राइझेस, विशाल एन्टरप्राइझेस, व एम पी एन्टरप्राइझेस हे पक्षकार होते किंवा कसे मला माहित

नाही. प्रथम पक्षकार यांच्याकडे नोकरीसाठी काय अटी व शर्ती आहे याची मी माहीती करून घेतली नाही. इतर कामगारांनी मला त्यांच्या वतीने साक्ष देणेसाठी अधिकार दिला नाही. हे खरे नाही की आमच्या व महानगरपालिकेचा कामाच्या बाबतीत कोणताही संबंध नव्हता. मी महानगरपालीकेकडे कामास होते याबाबत कोणताही पुरावा दाखल केला नाही हे मला माहित नाही. हे खरे नाही की मी खोटी साक्षी देत आहे.

उलटतपास पूर्ण

फेरतपास काही नाही

सही

( पि. रा. भावके–पाटील )
सदस्य,
औद्योगिक न्यायालय, पुणे

पुणे
दिनांक : २४/७/२०१८